## **ठळक बातम्या**

- मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब /महायुतीचा राज्यपालांकडे सत्तास्थापनेसाठी दावा, उद्या संध्याकाळी शपथविधी

- मागास जिल्ह्यांच्या विकासाकरता जागतिक बँकेकडून राज्याला नव्यानं कर्ज मंजूर

- अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांचा आज राज्यसभेतून सभात्याग.

**आणि**

- महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत तस्करीचं सोळा किलो मेफेड्रोन आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त

**<><><><><>**

महायुतीच्या नेत्यांनी आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस, अजित पवार, आणि इतर नेत्यांनी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांना दिलं. यावेळी केंद्रीय मंत्री निर्मला सितारामन, आणि भाजपा नेते विजय रूपाणी देखील उपस्थित होते.

राज्यपालांकडे जाण्याआधी एकनाथ शिंदे, देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांची बैठक झाली. त्यानंतर, हे तिन्ही नेते एकाच गाडीतून राजभवनाकडे रवाना झाले.

<><><><><>

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाबाबतचं कुतूहल आता देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानं संपलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत ते उद्या महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. भाजपाच्या गाभा समितीच्या आज झालेल्या बैठकीत भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी मुख्य निरीक्षक म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यावेळी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी फडनवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड जाहीर करण्यात आली.

महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर होणार आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ फडनवीस तिसऱ्यांदा घेणार आहेत, तसंच उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथविधीही होणार आहे. फडनवीस यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यामुळे धुळे, नंदुरबार जिल्ह्यातल्या भाजपा कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला आहे.

<><><><><>

महायुतीचे प्रमुख नेते देवेंद्र फडनवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याची माहिती दिली. महायुतीत आतापर्यंत सर्व निर्णय एकत्रितपणे घेतले गेले असून यापुढेही एकत्र राहून निर्णय घेऊ, असं भाजपा विधिमंडळ पक्ष नेते देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाचा उल्लेख करत फडनवीस यांनी जनतेचे तसंच भाजपा नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, जेपी नड्डा आणि आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांचे आभार मानले. नवं सरकार राज्याच्या प्रगतीसाठी काम करेल असं देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

**बाईट फडनवीस - होल्ड (३६ सेकंद)**

महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबवले असून नव्या सरकारमध्येही एकसंधपणे काम करू असं शिवसेना मुख्य नेते **एकनाथ शिंदे** यांनी सांगितलं. तर राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी, तसंच विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करू, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष **अजित पवार** म्हणाले.

**<><><><><>**

विकास प्रक्रियेत मदत करण्यासाठी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळानं राज्याला ३ डिसेंबर रोजी नव्यानं कर्ज मंजूर केलं आहे. राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागतिक बँकेच्या उपक्रमाचा हा भाग आहे. विकासाची संधी निर्माण करणं,

खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे. ५० हजार **कोटींची** राज्याची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तरीही राज्याच्या जीडीपीपैकी पन्नास टक्के उत्पादन केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळे राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. या उपक्रमामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट साध्य करायला हातभार लागेल, असं जागतिक बँकेचे भारतातले संचालक ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज, अन्नधान्याचे किमान आधारभूत दर निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर एमएसपी, फेंजल चक्रिवादळ, संभल हिंसाचार आणि अदानी लाचखोरी प्रकरणावर विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव का दिला नाही, या धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला. त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांच्या सदस्यांसह इतर सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

बॉयलर संदर्भातल्या शंभर वर्षं जुना कायदा रद्द करून, बॉयलर दुरुस्ती विधेयक, २०२४ आज राज्यसभेत मंजूर झालं. या विधेयकाच्या मंजुरीनंतर केंद्र सरकार केंद्रीय बॉयलर मंडळाची स्थापन करू शकणार

आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज राज्यसभेत दिली. या विधेयकात बॉयलरमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी विशेष तरतूद केली आहे. तसंच, बॉयलरच्या दुरुस्तीच्या कामासाठी सुयोग्य आणि सक्षम तंत्रज्ञ नेमला जाणं अनिवार्य असेल. देशातल्या ४० लाखांहून अधिक बॉयलर्सना याचा लाभ मिळणार आहे. बॉयलर्समध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा मिळवून देणं, हेच या विधेयकामागचं उद्दिष्ट असल्याचंही पीयूष गोयल यांनी सांगितलं.

<><><><>

रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ वर आज लोकसभेत चर्चा झाली. या विधेयकामुळे रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयकावर चर्चा करताना सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेमध्ये प्रगती आणि परिवर्तन झाल्याचं वैष्णव म्हणाले.

<><><><>

डीआरआय अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं तस्करीच्या एका प्रकरणात सोळा किलो मेफेड्रोन हा मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करणारा अंमली पदार्थ आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. १९८५ सालच्या NDPS या कायद्याच्या तरतुदीनुसार या प्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. हैद्राबादहून मुंबईला जाणाऱ्या एका बस मधून जाणारे दोन प्रवासी मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करत असल्याची गुप्त माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या आधारावरून पाळत ठेवून काल पहाटे या दोन प्रवाशांना अधिकाऱ्यांनी

अटक केली. त्यानंतर मुंबईतून आणखी तीन संशयितांना रोख रकमेसह ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

वाशिम जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र तसंच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमानं  आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसांच्या भव्य युवा महोत्सवालाआणि विज्ञान  प्रदर्शनाला आजपासून वाशीम इथं सुरुवात झाली. कथा लेखन, चित्रकला, कविता, फोटोग्राफी या स्पर्धांनी या युवा महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला.

<><><><><>

महाराष्ट्रात चंद्रपूर,  गडचिरोली तसंच नागपूर जिल्ह्यात आज सकाळी साडे सातच्या सुमाराला  भुकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भुकंपाची तीव्रता ५ पूर्णांक ३ दशांश रिक्टर स्केल असल्याचं राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं जाहीर केलं आहे. तेलंगणा राज्यातील मुलुगु या भुकंपाचा केंद्रबिंदू होता, गोदीवरी नदीच्या खोऱ्यात भुकंपाचे धक्के कमी अधिक प्रमाणात जाणवले. या दशकातला हा सर्वाधिक  तीव्रतेचा भूकंप असल्याचं अभ्यासकांचं म्हणणं आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत आज ११० अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ९५६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १० अंकांची किरकोळ वाढ नोंदवत २४ हजार ४६७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेत भारतानं संयुक्त अरब अमिरातीवर दहा गडी राखून विजय मिळवला. यूएईच्या १३८ धावांचं आव्हान भारतानं सतराव्या षटकातच पूर्ण केलं. आयुष म्हात्रेनं ६७ तर वैभव सूर्यवंशीने ७६ धावा करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

<><><><><>

ओमान इथं सुरु असलेल्या पुरुषांच्या हॉकी ज्युनियर आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडे आठ वाजता सुरू होईल. काल या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघानं मलेशियाला ३-१ ने नमवत अंतिम फेरी गाठली होती.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं १४ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//